वर्ष : १४ ❑ अंक : ६
सौर ज्येष्ठ, शके १९३७
(मे, २०१५)
वार्षिक वर्गणी : ₹ ३०

पर्यावरणाशी कृतिशील नातं

# गतिमान संतुलन

संपादक : दिलीप कुलकर्णी

**भूमिका**
'निसर्गस्नेही जीवनशैली' आणि 'पर्यावरणस्नेही विकासनीती' ह्यांचा पुरस्कार करणारं, त्या दृष्टीनं विचार आणि कृति-कार्यक्रम पुढे ठेवणारं हे माध्यम आहे. आत्मपरिवर्तनाच्या ह्या प्रयत्नांत आपणही सहभागी व्हा आणि इतरांनाही सहभागी करून घ्या.

## कोसळेल इमला समूळ एका राती !

कुसुमाग्रजांची 'मातीची दर्पोक्ती' नावाची एक सुंदर कविता आहे. तिच्यातली ही एक ओळ. नेपाळमध्ये झालेल्या महाविनाशक भूकंपाच्या वार्ता ऐकून मला ती तीव्रतेनं आठवली.

कुसुमाग्रज ह्या कवितेत एक शाश्वत सत्य सांगतात : काळाच्या ओघात सर्व काही मातीला मिळून जातं! काही काळ मानव निसर्गाच्या नाकावर टिच्चून भव्य-उत्तुंग अशी काही निर्मिती करतो; पण, आज ना उद्या ते सारं कोसळतं–मातीला मिळतं. त्यांच्या ह्या कवितेचं ध्रुवपद आहे : 'मातीवर चढणे एक नवा थर अंती!' उंच प्रासाद, ताजमहाल, सत्तेच्या पताका, साऱ्या दौलती, रूपवती रमणी, योद्ध्यांचे बलशाही बाहू, बुद्धिवंतांचं पांडित्य, शिकंदर-वाल्मीकी-मनू, धनवंत-भिकारी-संत-पापी-व्यभिचारी : सगळं सगळं शेवटी मातीला मिळतं. चांगलं-वाईट, नीती-अनीती, सुंदर-कुरूप...सारे भेद त्या ठिकाणी संपतात आणि उरतं फक्त एक वास्तव : माती.

नेपाळमध्ये जी काही जीवित-वित्तहानी झाली, ती मन हेलावून टाकणारी असली, तरी शांतपणे विचार करता जाणवतं की, हे होणं अटळ आहे. निसर्गातल्या प्रलयंकारी घटना थोपवणं कुणालाही शक्य नाही. एक संपूर्ण भूखंडच्या भूखंड दुसऱ्यावर जाऊन आदळत असेल, तर ते थोपवणं मानवी आवाक्याबाहेरचं आहे.

आपल्या आवाक्यात एकच गोष्ट आहे : निसर्गातलं हे वास्तव प्रगल्भपणे आणि नम्रपणे स्वीकारून निसर्गाच्या मर्यादांचा आदर करणं. भूकंप, त्सुनाम्या, अतिवृष्टी, महापूर ह्यांच्या शक्यता सदैव गृहीत धरून मानवी निर्मिती ही साधी, छोटी, विकेंद्रित अशी ठेवणं. इमारती, पूल, मनोरे, कारखाने, बंदरं, जहाजं अशा मानवी निर्मिती जितक्या मोठ्या-भव्य-उंच-लांब, तितक्या त्या अशा आपत्तीत नाश पावण्याची शक्यता अधिक. अशा भूकंपात एक मजली घरही कोसळणार आणि शंभर मजलीही; पण, शंभर मजली घर कोसळण्याचा आघात फक्त शंभर पट नसतो : तो सहस्र पट असतो. शहरात गर्दी असल्यामुळे मरणाऱ्यांची संख्याही अशीच कैक पटींनी अधिक असते. म्हणजेच, 'आपत्ती' समान असूनही 'आघात' खूप तीव्र असतो. Small is beautifulचं महत्त्व अशा वेळी लक्षात येतं. छोटी एक-दोन मजली घरं, छोटी गावं, विरळ-विखुरलेली वस्ती अशी रचना असेल, तर नैसर्गिक आपत्तीचा आघात कमी होतो. नेपाळमधल्या भूकंपात माणसं किती मेली आणि पक्षी-वन्यपशू किती मेले? ह्या आकड्यांमधल्या फरकामधून आपण काही बोध घेणार की नाही? आपत्ती टाळता येऊ शकत नाहीत : त्यांचा तीव्र आघात मात्र निसर्गस्नेही रचनेतून निश्चितपणे टाळता येऊ शकतो. 'महापुरी झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती ।' हा तुकोबांचा दृष्टान्त हे आपत्तीच्या आघाताविषयीचं नेमकं भाष्य आहे.

ह्या निसर्गस्नेहितेचे अनेक पैलू आहेत. कुसुमाग्रज 'मातीवर चढणे एक नवा थर अंती' असं म्हणतात, तेव्हा त्यांना तो थर विघटनक्षम द्रव्यांचा—ज्यांची 'माती' होऊ शकते अशा पदार्थांचा—अपेक्षित आहे. त्यांची ही कविता आहे १९३५मधली. त्यावेळी ना सिमेंट होतं, ना प्लॅस्टिक. विद्ध्वंस झाला, तरी मातीवर थर चढणार तो माती, दगड आणि लाकडांचा. ही सर्व द्रव्यं निसर्गस्नेही आहेत : 'माती' होणारी आहेत. समस्यांना प्रारंभ होतो तो विटा आणि कौलं आल्यावर. सिमेंट, ॲसबेसटॉस आणि प्लॅस्टिकचा थर मातीवर चढला की, मग विचारायलाच नको. कशी आणि कधी विघटित होतील ही द्रव्यं? काठमांडूची पुन्हा 'माती' होईल का? कधी? सहस्रों वर्षं झाली तरी, मोहंजोदडो-हडप्पाची अजून 'माती' झालेली नाही!

माणूस सहस्रों प्रकारची घातक रसायनं सध्या वापरतोय. अशा विनाशकारी भूकंपामध्ये तीही राडारोड्याखाली गाडली जातात. त्यावर पाऊस पडेल, तेव्हा पाण्यात मिसळून ती कुठवर प्रदूषण करतील? किती काळ ती विषं जीवमात्रांचं पिण्याचं पाणी विषाक्त बनवत राहतील?

नेपाळमध्ये नसतील; पण, भारतात आणि जगातल्या अनेक देशांत, जमिनीखाली तात्पुरती साठवणूक केलेली किरणोत्सर्गी आण्विक उर्वरितं आहेत. जेव्हा तिथे भूकंप होईल, तेव्हा शिशाचं कवच भेदून त्यातली किती द्रव्यं हवेत मिसळतील, किती पाण्यात नि किती जमिनीत? ही भीती काल्पनिक नाही. अमेरिकेनं नेवाडा प्रांतातली युक्का पर्वतराजीची जागा अशी उर्वरितं पुरण्यासाठी 'सर्वांत सुरक्षित' म्हणून निवडली. त्या अहवालाची शाई वाळण्याच्या आधी तिथे ८.५ रिष्टर तीव्रतेचा भूकंप झाला! ह्या सर्व उर्वरितांपैकी मोठ्या प्रमाणावर असलेल्या प्लुटोनियमची सुरक्षित साठवणूक पुढची २।। लक्ष वर्षं करावी लागणार आहे. ती पृथ्वीतलावर जिथे कुठे केली जाईल, तिथे २।। लक्ष वर्षांत भूकंप-ज्वालामुखींचे उद्रेक होणार नाहीत, ह्याची खात्री कोणी देऊ शकेल काय?

—भूकंप सदैवच होत आले आहेत–पुढेही होत राहणार आहेत. ते कोणी रोखू शकत नाही; इमले कोसळून होणारं नुकसान टळू शकत नाही. पण, आपला 'विकास' जोवर पर्यावरणस्नेही असतो, तोवर निसर्गाची क्षतिपूर्ती करण्याची क्षमता तरी अबाधित राहते. आज विकासाच्या नावाखाली आपण जे काही करतो आहोत, त्यामुळे ही क्षमताच बाधित होते आहे. आघातातून सावरून सभ्यतेची पुनरुभारणी करायला आपण वावच ठेवलेला नाही. मातीवर एका सभ्यतेचा थर चढला, तरी तो जर मातीचाच असेल, तर त्यातून नवी सभ्यता पुन्हा उभी राहू शकते. पण, तो जर अविघटनक्षम, विषारी अशा पदार्थांचा असेल तर नव्या सभ्यतेची उभारणी करायची कशातून?

'विकासा'ची घोडदौड करताना ह्या वास्तवाचं भान ठेवायला नको का?

## खुनापेक्षा आत्महत्या चांगली!

शिमग्याचा महिना नसूनही पुण्यात सध्या रोज होळ्या पेटतात : कचऱ्याच्या! पुणे शहराचा कचरा उरुळीला नेऊन टाकला जायचा. तिथल्या ग्रामस्थांनी विरोध केल्यानंतर आता कचरा टाकायलाच जागा नाही; त्यामुळे तो जागेवरच जाळला जातोय.

हा कचरा जाळण्यामुळे विषारी वायूही हवेत मिसळतात, आणि सूक्ष्मकणही! पुण्याच्या सर्व भागांत हवेतल्या धूलिकणांचं प्रमाण प्रचंड वाढलं असल्याची नोंद हवामानशास्त्र संस्थेकडून झाली आहे. ही वाढ अनैसर्गिक असून, कचरा पेटवणं हेच तीमागचं कारण असल्याचं संस्थेचं म्हणणं आहे. २.५ मायक्रॉन आकाराच्या कणांचं प्रमाण गेल्या वर्षीच्या तुलनेत २५-३०% अधिक आहे; तर १० मायक्रॉन आकाराच्या कणांचं १५-२०% अधिक. हे सूक्ष्मकण फुप्फुसांत गेल्यानं दमा, ब्रॉंकायटिस, नेसल ॲलर्जी ह्यांचं प्रमाण वाढतं.

कचऱ्यामध्ये प्लॅस्टिकही अर्थातच असतातच. त्यांचं कमी तापमानाला ज्वलन झाल्यास ('धुमसणं') 'डायॉक्झिन' नावाची कर्करोगजनक विषारी द्रव्यं तयार होतात. श्वसनावाटे तीही शरीरात जातात.

थोडक्यात काय; तर, पुणेकरांनी आत्महत्या करण्याचं मनावर घेतलंय! पण, त्याकरिता मी त्यांचं अभिनंदनच करीन. उरुळी आणि फुरसुंगीच्या ग्रामस्थांचा खून करण्यापेक्षा, आपल्या कचऱ्याच्या आधारे आत्महत्या करणं केव्हाही चांगलं. जिला उत्तर नाही अशी समस्या निर्माण करणाऱ्यानं, ती दुसऱ्यावर लादून त्याचा खून करण्यापेक्षा त्या शस्त्रानं स्वत:चीच हत्या करावी, हेच न्यायोचित नाही का?

अन् सर्वच शहरांची स्थिती अशीच असूनही आम्हाला आणखी शहरीकरण हवंय; 'स्मार्ट सिटीज्' हव्यात. खरोखरच धन्य आहे आमची आणि आमच्या राज्यकर्त्यांची. अर्थात चूक राज्यकर्त्यांची नाही : You get a ruler you deserve! आम्हाला आत्महत्याच करायची असेल, तर राज्यकर्ते 'विकास' करणारच की!

*'स्वच्छ भारत अभियाना'च्या निमित्तानं लेखमाला*

**विकास, स्वच्छता आणि पर्यावरण** | **५**

## ...तर सर्व गुन्हे माफ! : २

**दिलीप कुलकर्णी**

*मंदिर, रूळगाडीचा डबा, एस्टी...सगळीकडेच आपलं वागणं स्वार्थी असतं.*

'घर ठेवाल साफ'चे काही स्वार्थी प्रकार आपण गेल्या वेळी पाहिले. असा स्वार्थ सर्वांच्याच हाडीमांशी भिनलेला असल्यानं सर्वांचंच वागणं असं स्वार्थी असतं. केवळ भारतीयांचंच नव्हे; तर, जगातल्या सर्व माणसांचं. ह्या खेपेस त्याचे काही भारतीय नमुने पाहू.

गेल्या महिन्यात भूतानहून परतताना कोलकात्यात थोडा वेळ असल्यानं दक्षिणेश्वर आणि बेलूर मठाच्या दर्शनासाठी गेलो होतो. बेलूर मठ हे 'मंदिर' नसल्यानं तिथे सर्वत्र स्वच्छता, टापटीप होती. पण, दक्षिणेश्वर हे एक नमुनेदार मंदिर असल्यानं तिथली 'स्वच्छता' काय वर्णावी! लाल जास्वंदीच्या फुलांचे शेकडो हार देवीला अर्पण केले जातात, नि उचलून दुसरीकडे कुठे तरी नेऊन टाकेपर्यंत त्यांचं निर्माल्य एका कोपऱ्यात सडत राहतं. सामान्यत: कोणत्याही मंदिरात निर्माल्याचं खत करण्याची यंत्रणा नसतेच. म्हणजेच ते सर्व निर्माल्य मंदिर-परिसराच्या बाहेरच कुठे तरी फेकून दिलं जातं. आपणही नाही का निर्माल्य, गणपतीच्या मूर्ती नदी-तळी-विहिरीत विसर्जित करत? त्या पाण्याची BOD त्यामुळे वाढून ते खराब झालं, विहिरी-तळी गाळानं भरली तरी आम्हाला त्याची फिकीर नसते. 'घर ठेवाल साफ, तर शंभर गुन्हे माफ'!

'घर ठेवाल साफ'चा हा धार्मिक अवतार. असाच कायम सलणारा-डाचणारा दुसरा अवतार रूळगाडीच्या प्रवासाचा. परवा कुठे तरी वाचलं की, भारतीय रूळमार्गांची लांबी ६४,००० कि.मी. आहे. (चू.भू.दे.घे.) ह्याची नोंद 'जगातला सर्वांत लांब संडास' अशी गिनिज् बुकात का होऊ नये? लोक डब्यातल्या संडासात पाणी टाकतात (?); पण, ते मलमूत्र पुढे कुठे जातं?—कुठेही नाही. ते गोळा करून त्यावर प्रक्रिया करण्याची कोणतीही सोय नसते. दोन रुळांच्या मध्ये ते पडतं, नि पावसाळ्यापर्यंत तसंच पडून राहतं. पावसाळ्यात ते वाहून खाली जमिनीत जिरलं म्हटलं, तरी खडीला खत मिळून काय उपयोग?

रूळगाडीतला 'डबा ठेवाल साफ'चा दुसरा प्रकार म्हणजे चहाचे प्लॅस्टिकचे पेले, जेवणाच्या प्लॅस्टिकच्या थाळ्या असा सर्व कचरा खिडकीतून बाहेर फेकून देणं. कितीही वाटलं, तरी त्याला पर्यायच नसतो. कारण, हा कचरा गोळा करून तो पुनर्चक्रणासाठी पाठवण्याची काही व्यवस्थाच नसते. त्यामुळे, डबा स्वच्छ राहतो; पण, रुळांच्या दोन्ही कडांना अशा कचऱ्याची रांगोळी पडत राहते.

तीच गोष्ट पाण्याच्या प्लॅस्टिकच्या बाटल्यांची. पाणी पिऊन झालं की, दे बाटली खिडकीतून भिरकावून! एका दिवसात किती लक्ष बाटल्या अशा प्रकारे बस-रूळगाड्यांतून फेकून दिल्या जात असतील? अन् हे फक्त बस-रूळगाडीच्या उघड्या खिडकीवाल्या डब्यांतून प्रवास करणारे 'खालच्या दर्जाचे' लोकच करतात असं नाही : एसी कारमधून प्रवास करणारे 'उच्च दर्जा'चे लोकही हेच करतात. गुटख्याची पाकिटं, लेज-कुरकुऱ्यांच्या प्लॅस्टिकच्या रिकाम्या पिशव्या, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, गुटखा-तंबाखूची पिंक : काच क्षणभर खाली करून ते हे सर्व बिनदिक्कत रस्त्यावर टाकतात! 'गाडी ठेवाल साफ, तर शंभर गुन्हे माफ!'

'एस्टी ठेवाल साफ'चेही असे अनेक प्रकार आहेत. कचरा, वडापावचे कागद थेट खिडकीतून बाहेर फेकून दिले जातात. सर्वांत किळसवाणा प्रकार म्हणजे डोकं बाहेर काढून उलटी करणं. पण, 'एस्टी ठेवाल साफ,तर शंभर गुन्हे माफ!'

'घर ठेवाल साफ'चा तिसरा अवतार म्हणजे बांधकाम क्षेत्र. हल्ली चांगली घरं पाडून त्या जागी नवी, मोठी घरं बांधणं (वाढीव FSI); जुन्या बंगल्यांचं वा सदनिकांचं नूतनीकरण/आधुनिकीकरण करणं; तोडफोड वास्तुशास्त्र अशा अनेक कारणांमुळे जुन्या वास्तुसाहित्याचा कचरा (राडारोडा) निर्माण होतो. त्यात सिमेंट आणि प्लॅस्टर ऑफ पॅरिस ही अ-विघटनक्षम द्रव्यं असतात. हा सर्व राडारोडा गावाबाहेर कुठे तरी, किंवा नद्या-नाल्यांच्या पात्रांच्या कडेला असा नेऊन ओतला जातो. त्यामुळे तिथल्या परिसंस्थांचं काय होतं ह्याची फिकीर ना घरमालकाला असते, ना कंत्राटदाराला, ना बिल्डरला. नूतनीकृत घर वा नवी इमारत एकदम पॉश, चकचकीत असली म्हणजे झालं : 'जुन्या इमारतीच्या राडारोड्यामुळे इतर कुणाची, नैसर्गिक परिसंस्थांची हानी तर होत नाहीये ना' ह्याच्याशी त्यांना काय देणं-घेणं? 'घर ठेवाल साफ, तर शंभर गुन्हे माफ!'

असेच प्रकार देशान्तर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही चालतात. त्यांचा विचार पुढच्या लेखात.

**मनिऑर्डर चालू आहे !**

❑ डाक विभागानं 'मनिऑर्डर' हा प्रकार बंद केल्याचं काही वाचकांनी कळवलं आहे. चौकशी करता असं काहीही नसल्याचं आढळलं. कुडावळ्यात आम्हाला नियमितपणे म.ऑ. मिळत आहेत. तरी, वाचकांनी म.ऑ.नंच वर्गणी पाठवावी.
❑ प्रत्येक वर्गणीदाराच्या नावाची ३०रु.ची स्वतंत्र म.ऑ. करावी.
❑ जुन्या वर्गणीदारांनी नावानंतर कंसात आपला पावती क्रमांक लिहावा.

# रामायणाचा पर्यावरणीय आशय

६

**सुरेश भागवत**

*रामायणाचा आशय पर्यावरणीयही आहे असं सुचवणारी ही लेखमाला : संयमित उपभोगाच्या जीवनशैलीचा पर्यावरणीय संदेश त्यातून कसा मिळतो हे प्रतीकात्मतेच्या दृष्टिकोणातून उलगडून दाखवणारी.*

रामायणकारांनी विचारपूर्वक, योजनापूर्वक पर्यावरणीय आशयाचे जणू अस्तर श्रीरामकथेला जोडले आहे असा पक्ष घेऊन ह्या लेखमालेत काही विवेचन केले. त्या आधारे श्रीराम-रावण ह्यांच्या संघर्षाच्या आशयाचे जे अनेक पैलू असतील, त्यांपैकी पर्यावरणीय पैलूची मांडणी अशी होईल :

—निसर्ग-प्रेरणा, काम-क्रोध, इ.वर विजय मिळवून तपस्वी जीवन स्वीकारणाऱ्या आणि निसर्गसंवर्धनाचे रचनात्मक कार्य करणाऱ्या ऋषींच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली

—निसर्ग-प्रेरित 'प्राकृत' व्यवहार करणाऱ्या; परंतु, निसर्गाशी समरस जीवनशैली अवलंबणाऱ्या वानरांच्या साह्याने

—संयत भोग व संतुष्टी बाळगणाऱ्या समाजाचे प्रतिनिधी व प्रमुख असलेल्या श्रीरामांनी

—कामोपभोगाच्या अतिरेकी विकृतीने मानवतेचा व निसर्गाचा ऱ्हास घडविणाऱ्या असुरांचा पूर्ण नि:पात व धनदांडग्या चंगळवादाचे प्रतीक अशा लंकेचे दहन करून

—सीतेच्या रूपातील निसर्गाच्या सर्जन-शक्तीचे, नवसर्जनाचे, निसर्गाच्या स्वयंभू धारणाशक्तीचे रक्षण केले.

* * *

रामायणकारांनी जर जाणीवपूर्वक पर्यावरणीय आशय श्रीरामकथेस लावलेला असेल, तर त्या पर्यावरणीय संवेदनशीलतेचे अन्यथा दर्शनही घडेल. ते असे :

(१) वा. रामायण हा धार्मिक ग्रंथ आहे असे मानले जाते. ह्या ग्रंथातील सुमारे १७ सर्गांत किमान ५ श्लोकांपासून अधिकाधिक १०० श्लोकांपर्यंत समृद्ध निसर्गाची, ऋतूंची वर्णने येतात. सर्व मिळून ४७५ ते ५०० निसर्गवर्णनपर श्लोक ह्या ग्रंथात आहेत. रामायणकारांचे निसर्ग-प्रेम त्यामधून दिसून येते. रम्य निसर्ग-वर्णनांमधील प्रतिमासृष्टी कशी आहे? रम्य, समृद्ध निसर्गाने युक्त अशा स्थानीं साक्षात् इंद्राचा दिव्य रथ अवकाशात तरंगतो; वातावरणात वाद्यांचे दिव्य झंकार होत असतात; स्वर्गातील अप्सरा तेथे येऊन नृत्य करतात व ते स्थान 'ब्राह्म्या लक्ष्म्या समावृतम्' असते.

(२) चैत्ररथवन, नंदनवन, मतंगवन, भरद्वाजांनी लोकपालांना आमंत्रित करून निर्माण केलेला सर्वैश्वर्ययुक्त आश्रम, पंचाप्सर तीर्थ, सप्तसागर तीर्थ, इ. रम्य वनोपवने, जलाशय वर्णिले आहेत. सुमारे सव्वाशे वृक्षांचे / वृक्षनामांचे उल्लेख आहेत. २५-३० पशुनामांचे, १५ पक्षी, तसेच अनेक जलचर, इंद्रगोपासारखे कीटक, इ.चेही उल्लेख आहेत.

(३) निषादराज गुहाची भेट झाल्यावर श्रीरामांनी त्याच्या प्रजेची, आप्तेष्टांची जशी चौकशी केली, तसेच वनांचीही केली.

(४) भरत भरद्वाजांना सैन्य, लवाजमा पाठी ठेवून भेटावयास गेला. हेतू हा की, आश्रमातील जलाशय, वृक्ष, इ.ची हानी होऊ नये.

(५) रामायणाच्या रचनेचा प्रारंभ—पहिला श्लोकच—क्रौंचीचा आर्त विलाप ऐकल्यावर वाल्मीकींनी अनुभवलेल्या वेदनेतून 'मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती समा:' अशा उत्स्फूर्त उद्गाराने झाला. पर्यावरणीय जाणिवेचा ह्याहून अधिक पुरावा कोणता असू शकतो?

रामायणकारांच्या पर्यावरणीय जाणिवेस निसर्गाची निरीक्षणे नोंदविण्याचे वैज्ञानिक अंगही आहे. युद्धकांडाच्या २३व्या सर्गात 'विमल सूर्यबिंबावर निळे डाग दिसत आहेत', 'सूर्यापासून आगीचे लोळ उठत आहेत–तुटून पडत आहेत' असे वर्णन श्रीराम-लक्ष्मणांच्या संवादात आहे. अयोध्याकांडाच्या ३८व्या सर्गात बांबूस ६०-७० वर्षांतून एकदा फुले येतात व त्यानंतर त्या बांबूच्या बेटाचा नाश होतो ह्या निसर्गस्थितीचा उल्लेख दशरथाच्या संवादात आहे.

* * *

रामायणाच्या पर्यावरणीय आशयाच्या विवेचनाविषयी काही महत्त्वपूर्ण खुलासे आवश्यक आहेत : (१) रामायणाचा हाच एकमेव आशय व बोध आहे असे नाही; विविध दृष्टिकोणांतून विविध आशय पुढे येतील. (२) प्रतीकात्म आशयाचे आग्रही विवेचन येथे असले, तरी श्रीरामायण ही निव्वळ रूपक-कथा आहे अशी माझी भूमिका नाही. रामायण ह्या महाकाव्यास प्रतीकात्म आशयाची जोड दिली आहे, असे मात्र मला वाटते.

पर्यावरणीय आशयाची ही मांडणी व ती करण्यापूर्वी झालेली जाणीव परिस्थितीसापेक्ष आहे. 'लाईफ स्टाईल'च्या आकर्षणाने, चमचमत्या सुख-विलासयुक्त जीवनाने मोहित होऊन मनुष्य केवळ निसर्गाचाच नाश करतो आहे असे नसून, तो आपल्या मन:स्वास्थ्याचा आणि शरीर-स्वास्थ्याचाही नाश करून घेतो आहे. मनुष्याची सुखाकांक्षा कधीच संपत नाही. सुखी जीवनाचे क्षितिज गाठण्याकरिता कितीही धावले तरी उपयोग नसतो : ते सतत पुढे सरकत असते. ह्या कारणानेच, देह-धर्म राखण्यास आवश्यक ते प्राप्त करण्याचा पुरेपूर प्रयत्न भल्या मार्गाने केल्यावर ईश्वरावर हवाला ठेवण्याचा व संतोष राखण्याचा जो हितोपदेश संत-महात्म्यांनी केलेला आहे, तो व्यक्तीला शारीरिक-मानसिक स्वास्थ्याचा, आणि समाज व निसर्गाच्याही सुस्थितीचा लाभ घडविणारा आहे. रामायणातूनही हाच हितोपदेश प्रतीकात्मतेने केलेला आहे, असे सध्याची परिस्थिती पाहून अधिक प्रकर्षाने वाटले. वाचकांनाही हा आशय पटेल, भावेल, अशी अपेक्षा आहे.

*(समाप्त)*

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय

११

*उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण ह्या धोरणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. आता दोन दशकांनंतर कोणतं चित्र दिसतं? अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी लिहिलेल्या ग्रंथातील निवडक माहिती संकलित करून 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.*

### प्रशासन : स्थानिक ते राष्ट्रीय

मूलभूत पर्यावरणस्नेही लोकशाहीच्या केंद्रस्थानीं आहे प्रशासनाची लोकसत्ताक पद्धत. ही लघुतम, स्थानिक अशा एककापासून आरंभ होत राष्ट्रीय स्तरापर्यंत विस्तारत जाते. भारताची घटना असा स्पष्ट निर्देश देते की, खेड्याच्या स्तरावर ग्रामपंचायत; तर, शहरात प्रभाग-स्तरावरील समित्या हे अशा प्रशासनाचं लघुतम केंद्र असेल. तथापि, ह्या रचनाही प्रतिनिधींकरवीच चालवल्या जातात, आणि वरच्या स्तरांवर आढळणारे प्रातिनिधिक लोकशाहीचे दोष इथेही आढळतात. वस्तुत:, ग्रामसभा वा प्रभागसभांचं सक्षमीकरण होणं अत्यंत महत्त्वाचं आहे. त्या त्या क्षेत्रातील (वाडी, गाव व प्रभाग) सर्व प्रौढ नागरिकांचा सहभाग ही आवश्यक बाब आहे. स्थानिक नैसर्गिक संसाधनं किंवा स्थानिक पर्यावरण ह्यांविषयांचे निर्णय अशा प्रकारे सर्व-सहभागातून होणं (प्रातिनिधिक पद्धतीनं नव्हे) अत्यावश्यक आहे. स्त्रिया आणि दुर्बळ घटकांचाही निर्णय प्रक्रियेत सहभाग असण्यासाठी विशेष प्रावधान असण्याची गरज आहे.

अशी काही उदाहरणं सध्याही अस्तित्वात आहेत. (१) महाराष्ट्रातलं मेंढा-लेखा हे गोंड आदिवासी गाव 'मुंबई-दिल्लीत आमचं सरकार : आमच्या गावात आम्हीच सरकार ' ह्या तत्त्वावर उभं आहे. तिथल्या ग्रामसभेनं विविध अभ्यास-गटांची स्थापना केलेली आहे आणि त्यांनी गोळा केलेल्या माहितीच्या आधारे सर्वसहमतीनं निर्णय केले जातात. गेल्या तीन दशकांत हे गाव अन्न, पाणी, ऊर्जा आणि उपजीविकेच्या सर्व बाबींत स्वयंपूर्ण झालेलं आहे, आणि त्यानं आपलं १८०० हेक्टर जंगलही शाबूत ठेवलं आहे. (२) पूर्वी उद्धृत केलेल्या विविध उदाहरणांव्यतिरिक्त अनेक शहरांत अंदाजपत्रकातील रकमा खर्च करण्याचे प्राधान्यक्रम नागरिकांनी सांगण्याचे—सहभागी अर्थसंकल्पनाचे—प्रयास झालेले आहेत.

वरच्या पातळींवरच्या सहभागी प्रशासनाच्या रचना ह्या अशा मूलभूत स्तरांवरच्या एककांमधूनच विकसित होऊ शकतात. विशिष्ट पार्यावरणिक वैशिष्ट्यं असलेल्या गावांचा समूह; विशिष्ट भूक्षेत्रातील गावं; किंवा अशाच प्रकारच्या अन्यही रचना अस्तित्वात येऊ शकतात. सध्या अस्तित्वात असलेल्या जिल्हा वा राज्यस्तरीय प्राशासनिक/राजकीय एककांशी त्या जोडल्या जाऊ शकतात. आंतरराज्यीय वा आंतरराष्ट्रीय प्रशासन ही मात्र एक आव्हानात्मक बाब आहे. अपयशी ठरलेल्या वा अंशत:च यशस्वी झालेल्या नदी-खोरे विकास प्राधिकरणासारख्या प्रयत्नांतून ह्यासाठी बरेच धडे मिळू शकतील.

### अर्थपूर्ण शिक्षण आणि स्वास्थ्य

पश्चिमी पद्धतीच्या शिक्षण-पद्धतीनं अध्येय विषयांचे अनेक कृत्रिम विभाग करून टाकले आहेत : भौतिक, प्राकृतिक, सामाजिक, इत्यादि विज्ञाने; आणि शिवाय विज्ञाने आणि मानव्ये, कला इत्यादीही. अशा विभाजनाला स्थान न देणं हा मूलभूत पर्यावरणस्नेही लोकशाहीसाठी सर्वांत प्रसंगोचित धडा असेल. पर्यावरणाच्या वा मानवी रचना अशा काटेकोरपणे विभागलेल्या घटकांनी तयार झालेल्या नसतात. भूक्षेत्रांमध्येही 'जंगली आणि पाळीव', 'नैसर्गिक आणि मानवनिर्मित' ह्यांमधल्या सीमारेषा धूसरच असतात. कोणतंही ज्ञान आपल्याला जितकं अधिक एकात्मपणे समजेल; शिकवता येईल वा हस्तांतरित करता येईल; विशेषज्ञांइतकाच व्यापकज्ञांनाही आपण जितका आदर देऊ लागू, तितका आपल्याला निसर्ग, आणि निसर्गातलं आपलं स्थान अधिक चांगल्या प्रकारे समजेल. शिकवण्याचे वा शिकण्याचे अनेक पर्यायी उपक्रम हे साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आंध्रातल्या *डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीच्या पाचसालेसारख्या* शाळा; *नर्मदा बचाओ आंदोलनाच्या जीवनशाळा*; गुजरातेतल्या तेजगढची *आदिवासी अकादमी*; डेहराडूनचं *बीज-विद्यापीठ*, किंवा उदयपूरचं *स्वराज विद्यापीठ* ह्यांसारख्या मुक्त-शिक्षण-संस्था ही अशा कामांचीच उदाहरणं आहेत.

अशाच प्रकारे अनेक गट हे लोक-स्वास्थ्य-प्रणालींवर काम करीत आहेत. पारंपरिक आणि आधुनिक ज्ञानाची जोड घालून; तसंच, सुरक्षित पाणी आणि अन्न, पोषण, प्रतिबंधात्मक आरोग्य-योजना आणि उपचार ह्यांमधील संबंध दृढ करून आपले स्वास्थ्यविषयक प्रश्न आपणच सोडवण्यासाठी जनसमूहांचं सबलीकरण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

### रोजगार आणि उपजीविका

स्थानिकीकरण आणि भूक्षेत्रीय नियोजन ह्यांच्या संयोगातून उपजीविकेच्या संधींमध्ये प्रचंड वाढ होऊ शकते. भारताला भेडसावणाऱ्या ह्या महत्तम समस्येचं उत्तर इथे सापडतं. भूमी आणि पाण्याच्या पुनरुज्जीवनातून उत्पादकता वाढेल आणि त्यातून रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध होतील. धारणाक्षम उपजीविकेचे स्थायी आधारही ह्यातून निर्माण होतील. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा, किंवा जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान ह्यांना अशा तऱ्हेची पर्यावरण-संवर्धक आणि उपजीविका-निर्मायक दिशा दिली जाऊ शकते. 'हरित रोजगारा'च्या ह्या नव्या संकल्पनेत श्रम-सघन अशा ग्रामीण उद्योगांवर आणि पायाभूत संरचनांवर नव्यानं भर दिला जाईल. हातमाग, हस्तकला, स्थानिक ऊर्जा-प्रकल्प, ग्रामीण रस्ते अशा बाबी पारंपरिक ज्ञानाच्या किंवा नव्यानं आत्मसात केलेल्या कौशल्यांच्या साहाय्यानं लोक निर्माणही करू शकतील; आणि त्यांवर नियंत्रणही ठेवू शकतील.

'युनायटेड नेशन्स एन्व्हायरॉन्मेंट प्रोग्रॅम' आणि 'इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन' ह्यांच्या अंदाजानुसार 'हरित रोजगारां'च्या क्षेत्रात भरपूर संधी उपलब्ध आहेत. अशा कामांना 'मानवोचित कामं' म्हटलं जातं. ती पार्यावरणिक समस्यांवरचाही एक महत्त्वाचा उपाय आहेत. उदाहरणार्थ, सध्याच्या रासायनिक शेतीपेक्षा छोट्या स्तरावरच्या सेंद्रिय शेतीतून अधिक रोजगारही उपलब्ध होतात आणि जमिनी नापीक होण्याच्या संकटांवर उपायही मिळतो. नवीकरणक्षम ऊर्जांचं उत्पादन आणि ऊर्जा-कार्यक्षमतेत वाढ ही क्षेत्रं अजून बाल्यावस्थेत आहेत; पण, त्यातून कोट्यवधींना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. शेती, ऊर्जा-निर्मिती ह्यांच्याप्रमाणेच ऊर्जा वाचवणारी वास्तु-रचना, विकेंद्रित वस्तुनिर्माण, पुनर्घटन, वनीकरण अशा क्षेत्रांची रोजगारक्षमता भारतात प्रचंड असू शकते. तथापि, ती अजमावण्यासाठी कोणताही अभ्यास आजवर केला गेलेला नाही.

*(क्रमश:)*

**विकासस्वप्न**

आजच्या परिस्थितीविषयी असमाधानी असणाऱ्या आणि विधायक विकासाची स्वप्नं पाहणाऱ्या प्रत्येकाला मूलभूत वैचारिक मार्गदर्शन करणारी आणि एक नवी जीवनदृष्टी देणारी विचारकथा.

*दिलीप कुलकर्णी* । *पृष्ठे* : १७६ । *किंमत* : रु.१००/-

**आकार जीवनाला !**

'विकासा'च्या फार मोठ्या किमती शरीर, मन, कुटुंब, समाज आणि पर्यावरण अशा सर्व स्तरांवर आपण सध्या प्रकट-अप्रकटपणे मोजत आहोत. त्या साऱ्या समजावून घेऊन युव मित्र-मैत्रिणींनी आपलं जीवनध्येय बदलावं आणि आपल्या जीवनाला योग्य तो आकार द्यावा, ह्या हेतूनं साधलेला हा संवाद.

*दिलीप व पौर्णिमा कुलकर्णी* । *पृष्ठे* : ५६ । *किंमत* : रु.२०/-

**पर्यावरण घरोघरीं**

पर्यावरण-चळवळीच्या अर्धशताब्दीनिमित्त तीन वर्षांपूर्वी प्रकाशित झालेली ही पुस्तिका. पर्यावरणाच्या समस्यांची कारणं शोधून त्यांवरचे उपाय समोर ठेवणारी. छोटीशीच; पण, 'गागर में सागर', 'बिंदूत सिंधू' ह्या स्वरूपाची. 'पर्यावरण-रक्षणासाठी आपणही काही तरी केलंच पाहिजे' अशी भावना निर्माण व्हावी ह्या उद्देशानं प्रकाशित केलेल्या ह्या पुस्तिकेच्या ९६,००० प्रती ग.सं.च्या वाचकांनी घरोघर पोचवल्या. आता तिचीच नेहमीच्या मोठ्या आकारातील पुनर्मुद्रित आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

*दिलीप कुलकर्णी* । *पृष्ठे* : ४८ । *किंमत* : रु.१०/-

संतुलन प्रकाशन

*ही आणि 'संतुलन प्रकाशना'ची अन्य पुस्तकंही पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, इथे विक्रीसाठी उपलब्ध आहेत. अधिक प्रतींवर विशेष सवलत.*

# पर्यावरणाचे भाग्यविधाते ५

**संतोष शिंत्रे**

**१५. मा जून**

अपारदर्शी, बिनलोकशाहीच्या, निसर्ग/पर्यावरणाविषयी कोणतीही सहानुभूती नसणाऱ्या, ‘विकासा’चे राक्षसी प्रारूप राबवणाऱ्या चीनसारख्या राष्ट्रात निसर्गासाठी काम करणे आणखी अवघड होऊन बसते. पण, मा जूनने ते करून दाखवले आहे. ह्या बाबतीत चीन सरकारशी बोलणे म्हणजे दगडावर डोके आपटणे आहे, हे लक्षात घेऊन त्याने वेगळाच मार्ग अनुसरला. चीनमध्ये आलेले अनेक पाश्चात्त्य उद्योग आणि त्यांचे चीनमधले पुरवठादार ह्यांनी केलेल्या प्रदूषणाचे आणि उत्सर्जित उष्मासंचायी वायूंचे आकडे त्याने इंटरनेटवर टाकून, पाश्चात्त्य जगातल्या ह्या उद्योगांच्या मुख्य कार्यालयांवर शांतपणे दबाव आणायला सुरुवात केली. आणि पाश्चात्त्य जग भरपूर जागृत असल्याने त्याचे परिणामही दिसू लागले. उदा. ‘ॲपल’ उद्योगाच्या चीनमधल्या आस्थापनेबाबतच्या २०११मधील पर्यावरणविरोधी वर्तनाच्या त्याच्या अहवालामुळे ‘ॲपल’ने आपल्या पुरवठादारांच्या साखळीमधल्या लोकांच्या अशा वर्तनाला चांगलाच चाप लावला. माचे पुढचे उद्दिष्ट चीनमधल्या सरकारी भागभांडवल उद्योगांचे ‘वर्तन’ सुधारणे हे आहे. माच्या म्हणण्यानुसार, चीनमध्ये प्रदूषणकर्त्यांना दंड भरणे हे वर्तन सुधारण्यापेक्षा स्वस्त पडत असल्याने दंड भरून मोकळे होण्याकडे कल जास्त आहे. तो असेही म्हणतो की, अमेरिकी लोक ‘आम्ही त्यांच्या नोकऱ्या घालवतो’ अशी तक्रार करतात; पण, ते वापरतात त्या उत्पादनांसाठी होणारे प्रदूषण आम्ही सहन करतो, हे ते लक्षात घेत नाहीत.

**१६. राजेंद्र सिंह**

‘गार्डियन’च्या यादीत ज्या अगदी मोजक्या भारतीय लोकांचा समावेश आहे, त्यांपैकी हे एक. वाचक ह्या नावाशी परिचित असण्याची शक्यता आहे. पारंपरिक जलसंधारण-पद्धतींचा वापर करून आजवर १०००हून अधिक खेड्यांना त्यांनी जल-स्वयंपूर्तता दिली आहे. राजस्थानातल्या पाचही स्थानिक नद्या ह्या कामांमुळे पुन्हा ‘वाहत्या’ झाल्या आहेत. भूगर्भ-जलाची पातळी वाढल्याने एक तृतीयांश इतके वन-आच्छादन वाढले आहे. ८६००पेक्षा अधिक ‘जोहड’ बांधून त्यांनी हे सर्व साध्य केले आहे. १४ मीटर इतकी खाली गेलेली भूगर्भ-जल-पातळी आता ६.७ मीटरवर आली आहे. मागील सरकारने स्थापलेल्या गंगा नदी स्वच्छ करण्याच्या मिशनच्या सभासदत्वाचा, निष्क्रियतेला कंटाळून त्यांनी राजीनामा दिला होता. चालू सरकारला त्याची दखलही घ्यावीशी वाटलेली दिसत नाही!

**१७. बंकर राय**

१९७२च्या आसपास तत्कालीन बिहारच्या काही जिल्ह्यांमध्ये काम करता करता ‘बेअरफूट कॉलेज’ ही संकल्पना राय व त्यांच्या सहकाऱ्यांनी विकसित केली. ‘कोणतेही औपचारिक शिक्षण झालेले नसणे’ हीच त्याच्या प्रवेशाची पूर्वअट. तळागाळातल्या माणसांना सदर ‘कॉलेज’ स्थानिक, उपजत असे ज्ञान काही पर्यावरणस्नेही तंत्रज्ञानाबरोबरीने शिकवते. आजवर २०,०००पेक्षा अधिक सौर अभियंते, स्थापत्य विशारद, शिक्षक अशांना त्यांनी समुचित तंत्रज्ञानासाठी प्रशिक्षित केले आहे. भारतातल्या शेकडो लोकसमूहांना आणि सात अन्य देशांतील गरिबांना अनेकविध प्रकारे ह्याचा फायदा झाला आहे. स्थानिक तंत्रज्ञानाच्या आधारे केलेला पाणीपुरवठा, सौर घटयुक्त प्रकाशयोजना, नदी ‘ओलांडू’ शकणारी सायकल, पडणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमा करून वाचवणाऱ्या इमारती अशा गोष्टींचा त्यात समावेश आहे. शाळेतून फक्त ‘साक्षरता’ मिळते; ‘शिक्षण’ होण्यासाठी कुटुंब, स्थानिक परंपरा आणि संस्कृती, पर्यावरण आणि व्यक्तिगत अनुभूती ह्यांचाच उपयोग होतो, ह्यावर ‘बेअरफूट’चा विश्वास आहे.

**१८. बीजादेवी**

चरितार्थाचे साधन नसल्यामुळे घरगुती कामासाठी वंदना शिवांकडे नोकरी मागायला गेलेल्या एका बाईचे समूळ परिवर्तन कसे झाले, ह्याची ही थक्क करणारी कहाणी. वंदना शिवांना तिचे बियाण्यांविषयीचे ज्ञान आणि त्याबाबतची ‘शहाणीव’ लक्षात आली. आज ‘बीजादेवीं’च्या देहरादून-जवळच्या ४० एकरांहून मोठ्या शेत-जमिनीवर निव्वळ भाताच्या ५००हून अधिक जाती; हरवू पाहत चाललेल्या डाळी, कडधान्ये, फळे, भाज्या ह्यांच्या १०००हून अधिक भारतीय स्थानिक जाती—आणि त्यांची बियाणी—सुखाने नांदत आहेत. हे शेत ही भारतातल्या १७ राज्यांमधल्या ३४ बीज-पेढ्यांना पारंपरिक भारतीय बियाण्यांचा पुरवठा करणारी मध्यवर्ती बीज-पेढी बनली आहे. शेती-संशोधनातले अनेक विद्यार्थी, संशोधक आणि शास्त्रज्ञ हे आता ह्या ठिकाणच्या ६ महिन्यांच्या उन्हाळी प्रशिक्षण वर्गांत मोठ्या संख्येने सहभागी होतात. शेतकरी ही अभिजात भारतीय बियाणी रांगा लावून विकत घेतात. त्यांच्याकडून कोणताही मोबदला बीजादेवी घेत नाहीत. फक्त ‘GM प्रकारची बहुराष्ट्रीय राक्षसी कंपन्यांची बियाणी वापरणार नाही’ हे अभिवचन मात्र त्यांच्याकडून त्या जरूर घेतात. बीजादेवींकडचे बियाणे वापरल्यामुळे मातीची सुपीकता कशी वाढत गेलेली आहे; पिकेही किडींपासून कशी मुक्त होत चालली आहेत हे शेतकऱ्यांना उमगत चालले आहे. ☯

*(क्रमशः)*

---

सकारात्मक आंदोलन

## एक रुपया : पर्यावरणासाठी

केंद्रीय अर्थसंकल्पातील निसर्ग-पर्यावरणासाठीची अत्यल्प तरतूद आणि केंद्र सरकारची एकूणच पर्यावरणविरोधी धोरणे ह्यांच्या विरोधात पुण्यातील तीन निसर्गप्रेमी संस्थांनी एकत्रितरीत्या नुकतेच ‘जागर अर्थसंकल्पाचा : एक रुपया पर्यावरणासाठी’ हे सकारात्मक आंदोलन सुरू केले आहे. २१ एप्रिल ते ५ जून २०१५ हा ह्या आंदोलनाचा कालावधी आहे. जीविधा, इकॉलॉजिकल सोसायटी आणि पिंपरी-चिंचवड सिटिझन्स फोरम ह्या संस्थांनी उभ्या केलेल्या ह्या अभिनव आंदोलनात सहभागी होण्यासाठी निसर्गप्रेमी आणि सर्वसामान्य नागरिकांनी ‘पंतप्रधान राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी’साठी प्रत्येकी एक रुपयाचा धनादेश पंतप्रधान कार्यालयाला नाव-पत्ता आणि पत्रासह पाठवायचा आहे. (पत्ता : प्रधानमंत्री कार्यालय, रायसीना हिल्स, नई दिल्ली 110001.) ह्या पत्रात निसर्ग-पर्यावरणा-साठी अधिक भरघोस आर्थिक तरतुदी मंजूर करणे; सुब्रह्मण्यम समितीच्या शिफारसी समूळ फेटाळून ही समिती बरखास्त करणे; केंद्र सरकारने आपला एकूण पर्यावरणविरोधी दृष्टिकोण बदलून निसर्गविषयक कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे; निसर्ग-संवर्धनासाठी ठोस पावले उचलणे आणि त्यासाठी ह्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि स्थानिक लोक ह्यांचा सहभाग वाढविणे, ह्या मागण्या करायच्या आहेत.

‘रास्ता रोको’ किंवा ‘धरणे’-आंदोलन करून सामाजिक व्यवस्था विसकळीत करण्याऐवजी सकारात्मक पद्धतीने आपला विरोध नोंदविणे ह्यावर ह्या आंदोलनाचा भर आहे. औद्योगिक विकास-प्रकल्पांची पार्यावरणिक आघात-पडताळणी न करता त्यांना ऑनलाईन मंजुरी देणे; पार्यावरणिक प्रश्नांबाबत न्यायव्यवस्थेचे अधिकार कमी करणे; किंवा अस्तित्वात असलेले निसर्ग-पर्यावरणविषयक कायदे कठोरपणे राबविण्याऐवजी सुधारणांच्या नावाखाली त्यांची पकड सैल करणे, ह्यांसारख्या केंद्र सरकारच्या निसर्गविरोधी धोरणांबाबत सामान्य नागरिकांना जागरूक करणे, आणि केंद्र सरकारपर्यंत नागरिकांचा असंतोष आणि विरोध पोचवणे हा ह्या आंदोलनाचा उद्देश आहे.

स्वतंत्र भारताच्या केंद्रीय अर्थ-संकल्पात निसर्ग-पर्यावरणासाठी आजवर कधीच घसघशीत तरतूद केली गेलेली नाही. २०१५-१६ ह्या वर्षात तर ती सर्वांत कमी आहे. एकूण अर्थसंकल्पीय रकमेच्या केवळ ०.००१% एवढीच रक्कम पर्यावरणासाठी पुरवलेली दिसते. ह्याचा अर्थ देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP) ०.०१२% एवढीच रक्कम भारतीय निसर्ग-पर्यावरणाच्या वाट्याला येते. शिवाय वने, वन्यजीव, जलस्रोत ह्यांच्या संरक्षण-संवर्धनासाठी निधी उपलब्ध न करता चुकीच्या आणि दिखाऊ गोष्टींना ह्या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात प्राधान्य दिलेले दिसते.

सध्याचे केंद्रीय धोरण आणि कृती ह्या दोन्ही पातळ्यांवर भारतीय निसर्ग-पर्यावरणाचा विनाशच सूचित होताना दिसतो आहे. सत्ताग्रहणानंतर पहिल्या शंभर दिवसांत ह्या सरकारने पार्यावरणिक निकष धाब्यावर बसवून २४० औद्योगिक प्रकल्पांना मान्यता दिली आहे. ह्याच सरकारने भारताचे पाच अत्यंत मूलभूत पर्यावरणविषयक कायदे बदलण्यासाठी सुब्रह्मण्यम समिती नेमून तिच्या शिफारसी सरसकट स्वीकारल्या आहेत. अर्थातच ही यादी फार फार मोठी आहे.

दुर्दैवाने, सामान्य नागरिक हे निसर्गविषयक सगळ्याच घडामोडींबाबत आणि त्यांच्या सर्वव्यापी परिणामांबाबत बहुतांशी अंधारात असतात, आणि अत्यंत उदासीन असतात. हे औदासीन्य मोडून सर्वसामान्यांना निसर्ग-पर्यावरणाच्या प्रश्नांशी जोडून घेण्याचाही ह्या आंदोलनाचा प्रयत्न आहे. आंदोलनाचा कालावधी संपल्यानंतर सहभागी नागरिकांची नावे आणि सह्या असलेले पत्र माननीय राष्ट्रपतींकडे पाठवून ‘भारतीय संविधान कलम ११५नुसार, निसर्ग-पर्यावरणा-साठीच्या तरतुदी वाढवून त्या संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवल्या जाऊन मंजूर व्हाव्यात; भारतीय निसर्गाच्या रक्षणा-साठीच्या कायद्यांची कडक अंमलबजावणी व्हावी,’ अशी विनंती केली जाणार आहे.

हे सकारात्मक आंदोलन पुण्यात सुरू झाले असले, तरी महाराष्ट्रातील इतर शहरे-गावे आणि इतर राज्यांमधील सहयोगी संस्थांमार्फत ते देशभरात पसरविण्याचा सदर संस्थांचा मानस आहे.

ह्या आंदोलनाच्या निमित्ताने enviroindia.org हे संकेतस्थळही तयार करण्यात आले आहे. ह्या संकेतस्थळावर आंदोलनाची पार्श्वभूमी अधिक स्पष्ट करणारी इतर माहिती आणि लेख उपलब्ध आहेत. पर्यावरण-अभ्यासक संतोष शिंत्रे ह्यांनी हे संकेतस्थळ विकसित केले असून ह्या आंदोलनाची मूळ संकल्पनाही त्यांचीच आहे.

भारतीय निसर्ग वाचविण्यासाठी आणि पर्यावरणविरोधी धोरणांबाबत प्रतीकात्मक निषेध नोंदविण्यासाठी सर्वसामान्य जनतेने पुढाकार घ्यावा, असे आवाहन सदर तिन्ही संस्थांनी केले आहे.

---

## ‘काय सोडणार’ अभियान

*‘पर्यावरणाच्या हितासाठी १ जानेवारीपासून काही तरी सोडा’ असं आवाहन ग.सं.मधून करण्यात आलं होतं. १ जानेवारीपासून (वा पूर्वीही) असं काही तरी सोडणाऱ्यांनी आपली त्यामागची प्रेरणा व विचार; ते सोडण्यामुळे काही त्रास जाणवतो का; लोकांच्या प्रतिक्रिया अशा मुद्द्यांवर काही लिहावं अशी अपेक्षा आहे. ह्या वेळी लिहीत आहेत पुण्याच्या*

**प्रीती जोशी**

‘काय सोडणार’ अभियानामुळे स्फूर्ती घेऊन मी संकल्प केला की, ह्यापुढे मी ready made व ready to cook खाद्यपदार्थांना रामराम ठोकणार; तसेच, स्टायरोफोमच्या ताटातील खाद्यपदार्थ व प्लॅस्टिकच्या use & throw पेल्यातील पेये सेवन करणार नाही.

गेल्या तीन महिन्यांत ४ वेळा माझ्याकडून ह्या संकल्पाचे उल्लंघन झाले आहे, ही ठसठस मनाला खूप टोचते-बोचते आहे. कधी प्रवासात, बाहेर कार्यक्रमात वा बैठकीत ह्या संकल्पाचे उल्लंघन होते आहे. संकल्प करताना मी ह्या बाबी ध्यानात घेतल्याच नव्हत्या, हे ही खरे. एकांगी विचार करून संकल्प केल्यास काय होते हा अनुभव मात्र ह्यामुळे गाठीशी आला आहे; आणि असे प्रसंग वारंवार घडू नयेत, म्हणून काय करता येईल, ह्यावरही विचार, द्वंद्व सुरू आहे.

प्राथमिक शाळेत अल्पोपाहारासाठी येताना घरातील ताट-वाटी, पेला, चमचा, इ. आणण्यास सांगत. आताही प्रवासात वा कौटुंबिक मेळावे, बैठकींदरम्यान असेच करावे का हा विचार मनात सुरू आहे.

जीवनशैली पर्यावरणपूरक व्हावी म्हणून मी पूर्वीपासून बऱ्याच गोष्टी करते आहे : गरज भासल्यासच पंखा वापरणे; कापडी पिशवीचा भाजी, वाणसामानासाठी वापर; जवळच्या ठिकाणी पायीच जाणे, सार्वजनिक वाहनाने प्रवास, दुचाकीचा माफक वापर; धुलाई-यंत्राचा अवजड कपड्यांसाठीच वापर; सुतीच कपडे वापरणे; उन्हाळ्यात कपडे वाळवण्यासाठी spin-tub न वापरणे; अनावश्यक वैयक्तिक खरेदी टाळणे, इ. कृती आता माझ्या अंगवळणी पडत आहेत. घातक रसायने-विरहित टॉमेटो सॉस आम्ही घरीच तयार करतो. घरात कचरा कमीत कमी व्हावा, पाठकोऱ्या कागदांचा वापर, काटकसर ह्या आई-बाबांच्या सवयी माझ्यात पण उतरलेल्या आहेत.

मी रस्त्यात कचरा फेकत नाही आणि असा कचरा दिसल्यास वाकून उचलताना मला आता लाज वाटत नाही. माझ्या मुलीलासुद्धा मी आता हेच शिकवते आहे.

आईस्क्रीम खाणे मी वैयक्तिक पातळीवर वर्ज्य केले आहे; परंतु, मुलीसाठी कधी कधी ह्या संकल्पाचेही उल्लंघन होते. १९९७पासून मी विदेशी शीतपेयांचे सेवन बंद केले आहे. गेल्या दोन वर्षांत ‘हापूसचे खरे रंग’ वाचनात आल्याने हापूसचा वापर अंशतः का होईना कमी केला आहे. आंब्याचे देशी-स्थानिक प्रकार सुद्धा आम्ही चाखतो आहोत. माझ्या यजमानांना माझ्या ह्या कृती पटत नाहीत; परंतु वैयक्तिक पातळीवर मी ‘स्वान्तःसुखाय’ पर्यावरणस्नेही कृती करण्याचा प्रयास करते आहे. ह्या कामी ग.सं.कडून मिळणाऱ्या पाठबळा-साठी धन्यवाद अन् शुभेच्छा! आहार-विहार-आचार-विचार पर्यावरणपूरक करण्यासाठी ग.सं.मधील लेखन नेहमी मार्गदर्शन करते. ☯

---

## प्रतिसाद

☐ ग.सं.चे अंक वाचनीय आणि विचारणीय असतात. अनेक गोष्टी माहीत असतात; पण, वागणे होत नाही. पण, आपल्या लिखाणामुळे वागण्याची, आचरणात सुधारणा करण्याची प्रेरणा मिळते, व तसा प्रयत्न केला जातो.

*—कुमुदिनी नकाते, पुणे ४३*

☐ ग.सं.च्या अंकात काही तरी उपयुक्त, नवीन ज्ञान मिळते. सौर चैत्राच्या अंकात चीनच्या ‘भयंकर व घातक’ प्रगतीबद्दल वाचले. विनाशाकडे गमन ह्यालाच आम्ही ‘विकास’ म्हणतो, हे अतिशय दुःखद आहे. ‘रामायणाचा पर्यावरणीय आशय’, ‘स्वास्थ्य-पंचक’ ह्या लेखमाला खरोखर अत्यंत उद्बोधक, विचारप्रेरक आहेत. त्यांच्या वाचनाने मानसिक व बौद्धिक समाधान लाभते.

*—द.तु.नंदापुरे, लोणी, जि. यवतमाळ*

☐ ‘चीनच्या प्रगतीचं आकर्षण सर्व जगाला आहे’ येथे ‘प्रगती’ऐवजी ‘निर्मिती’ हा शब्द योग्य वाटतो. प्रगतीचे सध्याचे मॉडेल अधोगतीचे आहे, हे गं.सं.चे वाचक जाणतात. जगाला चीनच्या प्रगतीशी काहीही देणे-घेणे नाही. सर्वांना चिनी उत्पादने हवी आहेत : स्वस्तात, आणि आपल्या अंगणात अरिष्ट न ओढवता.

*—जयंत नेने, पुणे ३८*

☐ विविध तज्ज्ञांचे ग.सं.मधील लेख, इंग्रजी लेखांची भाषांतरे, हे बहुमोल ज्ञान आहे. रामायणाच्या पर्यावरणीय आशया-बद्दल आजवर कोठेही वाचले नव्हते. ह्यापुढे पर्यावरणपूरक जीवन जगण्याचे व इतरांना सोबत घेऊन पर्यावरण-रक्षणासाठी प्रयत्नशील राहण्याचे ठरवले आहे.

*—ज्ञानेश्वर टिळेकर, पुणे ३७*

*इंग्रजी नियतकालिकांतील पर्यावरणविषयक लेखांचा सटीक परिचय*

## हिरवं वाचन

**अजित बर्जे**

आज मानवाचे एकूणच वर्तन पर्यावरणाच्या व अंतिमत: त्याच्याच विनाशाकडे नेणारे असले, तरी अशा कृतींच्या परिणामाची जाणीव होऊन काही व्यक्ती व समूहांमध्ये सकारात्मक बदलही होत आहेत. अशा विधायक व रचनात्मक कार्याची ओळख करून देणाऱ्या लेखांची दखल ह्या वेळेपासून आपण घेणार आहोत. अशा घटना वा लेख मोजकेच असले, तरी व्यापक दृष्टीने विचार करता त्यांची नोंद घेणे इतरांनाही प्रेरणादायी ठरेल.

साधारण सहा महिन्यांपूर्वी 'हुदुद' ह्या चक्रीवादळाने विशाखापट्टणमला तडाखा दिला व त्यानंतर सतत सहा-सात तास मुसळधार पडणाऱ्या पावसाने हाहाकार माजवला. शहरातील जवळपास ९०% वृक्ष उन्मळून पडले. पडलेली झाडे व विजेच्या खांबांमुळे सर्व रस्ते ठप्प झाले. सात-आठ दिवस जवळजवळ सर्व दळणवळण-यंत्रणा, वीज, पाणी, अन्न, इंधन ह्यांचा शहरातील पुरवठा पूर्णत: कोलमडून पडला. अशा आणीबाणीच्या परिस्थितीतून सर्वांत आधी सावरले ते जगन्नाथराजू नगर. लोकांची इच्छाशक्ती जर बुलंद असेल तर काय घडू शकते ह्याचा तो नमुना होता. पण रहिवाशांची ही एकजूट एकाएकी उभी राहिली नव्हती. दोन दशकांपूर्वी तेथे राहणाऱ्या लोकांनी 'जगन्नाथराजू नगर रहिवासी संघ' स्थापन करून जो पाया रचला होता, त्याचा तो परिणाम होता. *टेरा ग्रीन* मासिकाच्या मार्च २०१५च्या अंकातील 'डिझॅस्टर मॅनेजमेंट अॅट द टाईम ऑफ नॅचरल हॅझार्ड्स्' ह्या लेखातून ह्या एकजुटीची प्रतीती येते.

विशाखापट्टणम् शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गालगत वसलेले जगन्नाथराजू नगर हे काही शे वस्ती असलेले रहिवासी क्षेत्र. गेल्या वीस वर्षांत ह्या रहिवासी संघाने त्या परिसरात अनेक उपक्रम राबविले ज्यामध्ये स्वच्छता, वृक्षारोपणाबरोबरच महिलांची सुरक्षितता, उघड्यावरील मल-मूत्र विसर्जनाला अटकाव, दारू व व्यसनाधीनतेच्या दुष्परिणामांबद्दल जागृती, मुलींची छेडछाड व चोऱ्यांबद्दल दक्षता ह्यांसारखे अनेक विषय हाताळले. ह्या सर्व कामांमध्ये तेथील प्रत्येक रहिवाशाचा व विशेषत: ज्येष्ठ नागरिकांचा सक्रिय सहभाग असतो. २००३ साली संघाच्या पहिल्या दशकपूर्तीनिमित्त दहा वर्षांतील उपलब्धींचा आढावा घेतला गेला; तसेच, जगन्नाथराजू नगराचा संपूर्ण शहरातील आदर्श नगर बनविण्याच्या दृष्टीने कृती-आराखडा तयार केला गेला. दोन वर्षांपूर्वी, ठरवलेली उद्दिष्टे किती साध्य झाली ह्याचा दुसऱ्या दशकपूर्तीनिमित्त आढावा घेतला गेला. तसेच, त्या शहराचे ढासळणारे पर्यावरण व त्याविरुद्ध लढण्यासाठी स्थानिक नागरिक-संघांची भूमिका ह्याविषयी कार्यक्रमाचे आयोजन करून भावी कृती-आराखडा निश्चित केला गेला.

संघाची काही प्रमुख उद्दिष्टे ह्या प्रमाणे आहेत : * प्रत्येक व्यक्तीने त्याच्या क्षमतेनुसार ऐच्छिक योगदान देऊन स्थानिक पर्यावरण अधिक सशक्त राहील ह्याची काळजी घेणे. * वृक्षलागवड करून त्यांची जोपासना करणे. * जनचैतन्य नावाच्या उपक्रमातून स्वच्छ, हरित, प्लॅस्टिकमुक्त परिसर ह्यांसारख्या जनजागृती-कार्यांत सहभाग घेणे व त्याप्रमाणे कृती करणे. * सार्वजनिक सोयी-सुविधा पुरवणे व संबंधितांबरोबर पाठपुरावा करणे. * समाजविघातक कृतींना आळा घालून परिसराची सुरक्षितता बळकट करणे. * स्थानिक प्रश्नांवर महानगरपालिका व इतर अधिकाऱ्यांबरोबर समन्वय साधून त्यांवर उपाययोजना करणे. * स्वयंशिस्त व मदतीतून 'वैश्विक विचार–स्थानिक आचार' ह्या तत्त्वाचा अवलंब करणे. * महत्त्वाचे म्हणजे 'समस्या सरकार सोडवेल' ह्याची वाट न पाहता एकमेकांच्या मदतीतून प्रश्न सोडविणे.

ह्याचा परिपाक म्हणजेच 'हुदुद' चक्रीवादळाच्या झंझावातानंतर काही तासांतच संघाने नियोजन करून आपत्ती-निवारण सुरू केले : रस्ते मोकळे केले; जनित्रांची सोय करून प्रत्येक घराचा पाणी व किमान विजेचा प्रश्न सोडविला; सात दिवस सर्वांनी मिळून श्रमदान करून परिसराची नीट स्वच्छता केली, जेणेकरून रोगराई पसरू नये. सरकारी मदत आली तेव्हा त्यांना सहकार्य करून नळजोडणी, वीजपुरवठा व इतर गोष्टी सुरळीत करण्यास साह्य करून प्रश्न लवकरात लवकर मार्गी कसे लागतील हे पाहिले. परिसरात ३०० नवीन झाडांची लागवड करून, देणगीदार मिळवून त्याला ट्री-गार्ड बसविले गेले.

हा संघ आपल्या परिसराची काळजी घेण्याबरोबरच शहरात वा अन्यत्रही जिथे गरज लागेल तिथे गट तयार करून इतरांना मदतीचा हात पुढे करतो. ह्याचा परिपाक म्हणजे, त्यांच्या संघाची व नगराची 'विशाखापट्टणम्मधील आदर्श नगर' म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या ह्या सहकारी वृत्तीमुळे सरकारी अधिकारीही तत्परतेने त्यांचे प्रश्न सोडवतात.

संघाचे एक मुखपत्रही प्रसिद्ध केले जाते. शिवाय, कार्याची ओळख व लाभ इतरांनाही व्हावा ह्या दृष्टीने त्यांनी स्वत:चे www.jrnrwa.com हे संकेतस्थळ सुद्धा सुरू केले आहे. सदासर्वकाळ सरकार व प्रशासनाच्या नावाने बोटे मोडत बसण्यापेक्षा देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाचे उत्तरदायित्व आहे ह्याचे भान ठेवल्यास आपले दैनंदिन जगणे अधिक सुसह्य कसे होऊ शकते, ह्याची हा संघ प्रतीती देतो. ☯

## भूतानची क्षणचित्रं । १

गेली कित्येक दशकं Gross National Happiness (GNH) ह्या आगळ्या संकल्पनेच्या आधारे आपल्या देशाचं नियोजन करणाऱ्या भूतान ह्या शेजारी देशाला भेट देण्याची इच्छा बरीच वर्षं मनात घर करून होती. गेल्या वर्षीच्या जोड विशेषांकासाठी भूतानची माहिती लिहीत असताना 'आता भूतानला भेट दिलीच पाहिजे' असं तीव्रतेनं वाटू लागलं. त्यातूनच, असं वाटणाऱ्या ७ जणांचा भूतान-दौरा २१ ते ३० मार्च ह्या काळात झाला.

प्रवास निसर्गस्नेही असणं ही अट असल्यानं आम्ही ह्या संपूर्ण काळात पाण्याची एकही बाटली घेतली नाही : स्थानकांवरचं वा मुक्कामांच्या ठिकाणचं पाणीच प्यालो. चहा/कॉफी प्लॅस्टिकच्या वा कागदी कपात प्यालो नाही : आम्ही आमचे पेले सोबत ठेवले होते.

आमचा हा प्रामुख्यानं अभ्यासदौरा होता. स्थलदर्शन त्या ओघात सहज होईल तेवढंच. मला भूतानवर पुस्तक लिहायचं असल्यानं GNHविषयीची अधिक माहिती, आकडेवारी मिळवणं; तज्ज्ञांशी चर्चा, प्रथमपुरुषी अनुभव; विविध समाजघटकांशी चर्चा, हे माझे उद्देश होते. थिंफू ह्या राजधानीच्या शहरातील 'GNH सेंटर' आणि 'GNH कमिशन' इथे बरीच माहिती, कागदपत्रं मिळाली. गेदू येथील महाविद्यालयात Universal Human Values in Higher Education ह्या विषयावरची एक ३ दिवसांची आंतरराष्ट्रीय परिषद होती, तीतही आमच्यापैकी ५ जण सहभागी झाले. तिथे भूतानच्या विविध भागांतून शिक्षक आणि अध्यापक आलेले होते. त्यांच्याशी झालेल्या गप्पांतून भूतानच्या विविध जिल्ह्यांतील परिस्थिती आणि GNHविषयक वास्तव कळलं. थिंफूतील लॉजची मालकीण सोनम; गेदूतील आमचे यजमान प्रा. देवेन आणि नम्रता प्रधान; ज्यांच्यामुळे आम्ही गेदू-परिषदेला जाऊ शकलो ते तिथले प्रा. उमेश जाधव; विविध टॅक्सीचालक ह्यांच्याकडून आम्हाला विविध माहिती मिळाली. ह्या सर्व माहितीच्या आधारे ग्रंथलेखन पुढील काळात होईलच.

ग.सं.मधून आम्ही सर्व जण पुढे ठेवू इच्छितो ती आम्हाला जाणवलेली भूतानची काही आगळीवेगळी वैशिष्ट्यं. क्षणचित्रांच्या रूपानं आम्ही ती वाचकांपुढे प्रस्तुत करण्याचं ठरवलं आहे. —*दि.कु.*

*आपल्याला जाणवलेली भूतानची काही वैशिष्ट्यं ह्या वेळी सांगत आहेत*

**पौर्णिमा कुलकर्णी**

**नरकातून स्वर्गात**

आम्ही कोलकात्यामार्गे हाशीमारा ह्या स्थानकावर उतरलो, नि तिथून २० कि.मी.वर असलेल्या भूतानेकडे टॅक्सीनं गेलो. भारतीय हद्दीतलं शेवटचं गाव जयगाव. ते एक नमुनेदार 'भारतीय' गाव आहे : गर्दी, गजबजाट, बाजारातली अव्यवस्था, धूळ, घाण, कचरा, इ.इ. गावातल्या मुख्य रस्त्याच्या टोकाशी आपण पोहोचलो की, उजवीकडे वळल्यावर एक सुंदर कमान दिसते : हे भूतानचं प्रवेशद्वार. त्या कमानीच्या सौंदर्यापासूनच भूतानच्या सौंदर्याची आपल्याला जाणीव होऊ लागते. कमानीतून पलीकडे गेलो की, फुंटशोलिंग हे गाव सुरू होतं. तिथे प्रवेशल्याबरोबर नरकातून स्वर्गात प्रवेश केल्याची सुखद जाणीव होते. रुंद, स्वच्छ, नेटके रस्ते; कडेला फूटपाथ; दुकानं नेटकेपणानं सजलेली; गर्दी-बजबजपुरी-अस्वच्छता नावालाही नाही. अवघ्या १०० फुटांत एवढा फरक पडू शकतो? मानसिकता एवढी बदलू शकते? जयगावला रोज जाणं-येणं होत असूनही फुंटशोलिंगकरांनी आपलं भूतानी स्वत्व आणि सत्त्व कसं काय बरं जपलं आहे?

**'सामान कुणीही चोरणार नाही!'**

भूतानमध्ये फिरण्यासाठी ७ दिवसांचा पर्यटक-परवाना मिळतो. कमानीजवळच ते कार्यालय आहे. आमचे अर्ज भरून देईपर्यंत त्यांची जेवणाची सुटी झाली. मग आम्हीही जेवून घेण्याचा विचार केला. प्रश्न सामानाचा होता. ते बरोबर घेऊन हॉटेल शोधत हिंडणं त्रासाचं होतं. 'त्यापेक्षा आळीपाळीनं जाऊ या का' असा विचार झाला. बाहेर पायऱ्यांवर आमची ही चर्चा चालू होती. ती ऐकून तिथे बसलेल्या दोघा टॅक्सीचालकांना आमची अडचण लक्षात आली. त्यातल्या एकानं सहज सांगितलं, ''आपका सामान ऊपर ऑफिस में ही एक बाजु में रख दो : कुछ नही होगा!'' अर्थात, आमची भारतीय मनं ह्या गोष्टीला तयार झाली नाहीत, ही बाब अलाहिदा. पण, भूतानमध्ये 'चोरी' हा प्रकार नाही, हा अनुभव मात्र प्रवेश केल्याकेल्या आला. भूतानमध्ये चोरही नाहीत आणि भिकारीही. आमचा Happiness Index हे बघून खूपच उंचावला! ☯


निसर्गामुळे ढळणारं स्वास्थ्याचं संतुलन : निसर्गाच्याच साहाय्यानं त्याचं पुन:स्थापन

**देणं निसर्गाचं– रक्षण आरोग्याचं**

**वैद्या पौर्णिमा कुलकर्णी**

सं संतुलन प्रकाशन

*पृष्ठे : ४८ । किंमत : ₹ २०*

*पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, इथे उपलब्ध*

सहावी आवृत्ती नुकतीच प्रकाशित


## आता वाचन केलियाचे फळ...

**सौर आरोग्य ।** दिलीप व पौर्णिमा कुलकर्णी

सध्या आपण 'शारीरिक रोगांचा अभाव' इतक्या संकुचित अर्थानं 'आरोग्य' हा शब्द वापरतो. आम्हाला हे पटायचं नाही. आरोग्य—'स्वास्थ्य' हा अधिक चांगला शब्द—ही एक बहुआयामी संकल्पना आहे. व्यक्तीच्या शारीरिक स्वास्थ्याबरोबरच तिचं मन, बुद्धी आणि आत्मा ह्यांच्याही स्वास्थ्याचा विचार करावा लागतो; नि परिवार, समाज आणि पर्यावरण हे स्वस्थ असल्याशिवाय व्यक्तीला स्वास्थ्यलाभ होऊ शकत नाही. म्हणूनच आरोग्याचा विचार हा 'ह्या सर्व स्तरांवरचं आरोग्य' असा व्यापक आणि एकात्मपणे केला जायला हवा, असं आम्हाला वाटलं. अशा आरोग्याची प्राप्ती ही सूर्याशी जोडलेली जीवनशैली आणि सौर-ऊर्जेशी जोडलेली विकासनीती ह्यांद्वारेच केवळ होऊ शकते. ह्या अर्थानं आम्ही त्याला 'सौर आरोग्य' असं म्हटलं आहे. उपचारात्मक किंवा प्रतिबंधात्मक उपायांच्या पलीकडे जाऊन विधायक आरोग्याची दिशा दाखवणारं हे पुस्तक आपण अवश्य वाचा आणि स्वस्थ बना.

प्रकाशक : राजहंस प्रकाशन. आवृत्ती : तिसरी. किंमत : रु.९०/-

**...क्रिया पालटे तत्काळ**

**सौर दिनदर्शिका** — **सौर ज्येष्ठ, शके १९३७ (मे-जून २०१५)**

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१<br>21 जून | | | | | १<br>मे 22 | २<br>23 |
| ३<br>24 | ४<br>25 | ५<br>26 | ६<br>27 | ७<br>28 | ८<br>29 | ९<br>30 |
| १०<br>31 | ११<br>1 | १२<br>2 | १३<br>3 | १४<br>4 | १५<br>5 | १६<br>6 |
| १७<br>7 | १८<br>8 | १९<br>9 | २०<br>10 | २१<br>11 | २२<br>12 | २३<br>13 |
| २४<br>14 | २५<br>15 | २६<br>16 | २७<br>17 | २८<br>18 | २९<br>19 | ३०<br>20 |


**गतिमान ☯ संतुलन**

❏ फक्त एका वर्षाचीच वर्गणी स्वीकारली जाईल. ❏ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह आहे. ❏ अंक दरमहा दि.२१ला पोस्टात टाकला जातो. महिनाअखेरपर्यंत तो न मिळाल्यास तशी पोस्टकार्डावरील तक्रार कुडावळ्यास पाठवा. प्रती शिल्लक असल्यास दुसरी प्रत पुढच्या अंकासोबत अवश्य पाठवली जाईल. ❏ जुन्या अंकांच्या प्रती शिल्लक नसतात. ❏ वार्षिक वर्गणी म.ऑ.ने कुडावळ्यास पाठवावी, चेक नकोत. ❏ वर्गणी पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, येथे रोखीने भरता येते.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक दिलीप दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनी स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापवून घेऊन १ मेघदूत, स्नेहनगर, पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले. संपादक : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

**पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)**

टपालाने सवलतीच्या दरात पाठवण्याचा परवाना क्र. : PCW/088/2015-2017

प्रेषण : स.प.महाविद्यालय, पुणे ४११०३० डाकघरातून; दरमहा दि.२१ला

खाली चिकटवलेल्या आपल्या नाव-पत्त्याच्या चिट्ठीवरचा कालावधी **मे १५** असा नोंदलेला असेल, तर आपली वर्गणी ह्या अंकाबरोबर संपते. कृपया त्वरित नूतनीकरण करा.

पावती क्रमांक — कालावधी पर्यंत

**प्रति**

**प्रेषक** गतिमान संतुलन, कुडावळे ४१५७१२, ता. दापोली, जि. रत्नागिरी

पंजीकरण क्र. : MAHMAR/2002/12860
घोषणापत्र क्र. : PHM/SR/176/VIII/2002, दि.3/10/2002